# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ३०/०९/२०२६ (बुधवार)**

.....................................................................................................

## नागपुर ग्रामीण जिल्हयात एक गणपती –एक अंमलदार या दत्तक गणपती योजनेमुळे संवाद, समन्वयातून शांततामय गणेशोत्सव

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात नागपूर ग्रामीण जिल्हयात गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर नागपूर ग्रामीण पोलीस दलाच्या वतीने एक गणपती –एक अंमलदार म्हणजे दत्तक गणपती योजना राबविण्यात आली. या उपक्रमांतर्गत गणेश मंडळनिहाय एका पोलीस अंमलदाराची नियुक्ती करून मंडळाच्या पदाधिकाऱ्यांशी सातत्याने संपर्क व समन्वय साधण्यात आला. त्यामुळे मंडळांच्या अडचणी, मिरवणूक, ध्वनीप्रदूषण, वाहतूक तसेच कायदा व सुव्यवस्थेच्या बाबींवर थेट संवाद साधणे शक्य झाले. या उपक्रमातून ध्वनीप्रदूषणाला आळा, मिरवणुकीतील शिस्त, संभाव्य वाद टाळणे, सामाजिक सलोखा आणि नागरिकांमध्ये जनजागृती करण्यास सकारात्मक परिणाम दिसून आला.

**पोलीस स्टेशन अरोली** :– पोलीस स्टेशन अरोली हद्दीत कोदमेंढी येथे दत्तक अंमलदारांनी मंडळांच्या पदाधिकाऱ्यांना ध्वनीप्रदूषणाचे दुष्परिणाम आणि कायदेशीर बाजु समजावून सांगितल्यानंतर मंडळांनी डीजेचा वापर टाळून पारंपरिक वाद्यांच्या माध्यमातून विसर्जन मिरवणुका काढल्या. तसेच खात येथे दोन मंडळांच्या विसर्जन मिरवणुकांमध्ये वेळेचे नियोजन करून संभाव्य गर्दी व वाद टाळण्यात आले. गणेश मंडळांना जनजागृतीचे उपक्रम राबविण्यासाठी प्रोत्साहित करण्यात आले.

**पोलीस स्टेशन जलालखेडा** :– पोलीस स्टेशन हद्दीतील लोहारी सावंगा येथे दत्तक अंमलदार यांनी मंडळाच्या पदाधिकाऱ्यांशी नियमित संपर्क ठेवून डीजेच्या दुष्परिणामांबाबत मार्गदर्शन केले तसेच कायदेशीर बाजु समजावून सांगितली. या मार्गदर्शनाला मंडळाने सकारात्मक

प्रतिसाद देत डीजेऐवजी पारंपरिक वाद्यांचा वापर करून शांततेच्या मार्गाने विसर्जन मिरवणूक काढली.

**पोलीस स्टेशन केळवद** :– पोलीस स्टेशन केळवद हद्दीतील मंगसा गावात दत्तक अंमलदार यांनी मंडळांमध्ये सायबर क्राईम व इतर बाबतीत जनजागृती केली. तसेच दोन गणेश मंडळांच्या विसर्जन मिरवणुकीदरम्यान कार्यकर्त्यांमध्ये वादाची परिस्थिती निर्माण झाल्यानंतर दोन्ही मंडळांच्या पदाधिकाऱ्यांना समजावून सांगून परिस्थिती नियत्रंणात आणण्यात आली आणि दोन्ही मंडळांचे विसर्जन शांततेत पार पडले.

**पोलीस स्टेशन पारशिवनी**:– पोलीस स्टेशन पारशिवणी हद्दीत तसेच तामसवाडी येथे दत्तक अंमलदारांच्या मार्गदर्शनानंतर गणेश मंडळाने डीजे न लावता भजन–दिंडीच्या माध्यमातून पारंपरिक पद्धतीने विसर्जन मिरवणूक काढली. तसेच मंगलनगर, पारशिवणी येथील मंडळाने धुमाल/डीजेची गाडी परत पाठवून ढोल–ताशांच्या गजरात विसर्जन केले.

**याचप्रमाणे नागपूर ग्रामीण जिल्ह्यातील इतर पोलीस स्टेशनच्या हद्दीतही एक गणपती –एक पोलीस अंमलदार हा उपक्रम प्रभावीपणे राबविण्यात आला. नियुक्त अंमलदारांनी मंडळांचे पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक यांच्याशी सातत्याने संपर्क ठेवून आवश्यक मार्गदर्शन केले.**

या सकारात्मक घटनांमधून एक गणपती – एक अंमलदार योजनेमुळे पोलीस व गणेश मंडळांमध्ये थेट संवाद आणि विश्वासाचे नाते निर्माण होऊन समस्या समजावून सांगण्याच्या व समन्वयाच्या माध्यमातून सोडविण्यास मदत झाली, तसेच शांतता, सामाजिक सलोखा आणि सुव्यवस्था राखण्यास हातभार लागला.

## नवीन कायद्यानुसार ६० व ९० दिवसांच्या विहित मुदतीत दोषारोपपत्र दाखल करण्यात नागपूर ग्रामीण जिल्हयाची सातत्यपूर्ण उल्लेखनीय कामगिरी

नवीन फौजदारी कायद्यांतर्गत तपास प्रक्रियेत निर्धारित मुदतीचे काटेकोर पालन करण्यावर विशेष भर देण्यात आला असून, संबंधित प्रकरणांमध्ये ६० व ९० दिवसांच्या विहित मुदतीत तपास पूर्ण करून दोषारोपपत्र न्यायालयात दाखल करणे आवश्यक आहे.

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हायांच्या मार्गदर्शनाखाली नागपूर

ग्रामीण जिल्हा पोलीसांकडून तपास प्रक्रियेत वेळेचे नियोजन, प्रकरणांचा नियमित आढावा तसेच दोषारोपपत्र विहित मुदतीत न्यायालयात दाखल करण्याबाबत सातत्याने विशेष लक्ष दिले जात आहे.

या अनुषंगाने नागपूर ग्रामीण जिल्ह्याने मागील काही महिन्यांपासून सातत्याने उल्लेखनीय कामगिरी नोंदविली असून, विहित मुदतीत दोषारोपपत्र दाखल करण्याच्या कामगिरीत जिल्ह्याचा राज्यस्तरीय क्रमवारीत सातत्याने दुसरा व तिसरा क्रमांक राहिला आहे. तपास अधिकाऱ्यांकडून प्रत्येक प्रकरणाच्या तपासाची प्रगती नियमितपणे तपासली जात असून, आवश्यक कागदपत्रांची पूर्तता, तपासाची गुणवत्ता आणि न्यायालयीन प्रक्रियेसाठी आवश्यक बाबींची पूर्तता वेळेत करण्यावर भर देण्यात येत आहे. **दिनांक ०१/०७/२०२४ ते दिनांक सप्टेंबर २०२६ या कालावधीत नागपूर ग्रामीण जिल्ह्यात ६० दिवसांच्या मुदतीतील  ७०.१४ टक्के, तर ९० दिवसांच्या मुदतीतील ६९.९३ टक्के दोषारोपपत्रे निर्धारित मुदतीत दाखल करण्यात आली आहेत. नवीन कायदा लागू झाल्यापासून मुदतीत दोषारोपपत्र दाखल करण्याच्या बाबतीत नागपूर ग्रामीण जिल्ह्याने सातत्यपूर्ण उत्तम कामगिरी केली आहे. मे २०२६ मध्ये ५ वा क्रमांक, जून २०२६ मध्ये ७ वा क्रमांक, जुलै २०२६ मध्ये ७ वा क्रमांक, ऑगस्ट २०२६ मध्ये ७ वा क्रमांक आणि सप्टेंबर २०२६ मध्ये ३ रा क्रमांक प्राप्त केला आहे.**

नागपूर ग्रामीण पोलिसांच्या या सातत्यपूर्ण कामगिरीमुळे तपास प्रक्रिया अधिक गतिमान, शिस्तबद्ध आणि वेळेत पूर्ण होण्यास मदत होत आहे.

## अवैधरित्या विनापरवाना विदेशी दारूची वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद, ६४ हजार ६४०रूपयांचा मुद्देमाल जप्त, कोंढाळी पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन कोंढाळी** :— दिनांक २९/०९/२०२६ कोंढाळी पोलीसांना गोपनिय माहीती मिळाली की, दुचाकी वाहनाने अवैधरीत्या विदेशी दारूची वाहतुक करीत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी तात्काळ आडेगाव येथे नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान मोटार सायकल क्र एम एच—४०/सी वाय— ०४९८ मिळुन आली. वाहन थांबवुन वाहनाची पंचासमक्ष पाहणी केली असता विदेशी दारू मिळुन आली. **आरोपी नामे १.कैलास**

**निमदेव वाघधरे, वय ४२ वर्ष, २. विक्की ज्ञानेश्वर ढवळे, वय २८ वर्ष, दोन्ही रा. अडेगाव ३. विजय जयस्वाल, रा. बाजारगाव हे अवैधरीत्या विदेशी दारूची वाहतुक करतांना मिळुन आले.**

**पोलीसांनी पंचासमक्ष १) वेगवेगळया कंपनीच्या विदेशी दारूच्या ७२ निपा किंमती १४,६४०/—रूपये २)** मोटार सायकल क्र. एम एच—४०/सी वाय— ०४९८ **किंमती ५०,०००/—रूपये, असा एकुण किंमती ६४,६४०/— रुपयांचा मुददेमाल जप्त केला आहे. नमुद तिनही आरोपी यांचेविरूद्ध महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

## अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद, ६०,५९०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त
## देवलापार पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन देवलापार** :— दिनांक २९/०९/२०२६ रोजी देवलापार पोलीसांना गुप्त बातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, मौजा हिवराबाजार शेत शिवार येथे काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे मौजा हिवराबाजार शेत शिवार येथे पोलीस घटनास्थळी पोहचले असता, नमुद घटनास्थळी काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळताना दिसुन आले. पोलीसांनी **आरोपी नामे १) अंकेश गेंदलाल धुर्वे, वय २५ वर्ष, रा. वरघाट २) सागर राजेंद्र खोब्रागडे, वय २६ वर्ष, रा. फुलझरी यांना ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळताना जागीच पकडले. ०३ इसम घटनास्थळाहुन पळुन गेले. पोलीसांनी घटनास्थळावरून ५२ तासपत्ते आणि** १) रोख रक्कम ५४०/—रूपये, वेगवेगळया कंपनीच्या ०२ मोटरसायकल, ०१ मोपेड वाहन असा एकुण ६०,५९०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

**नमुद ०५ आरोपीतांविरूद्ध पोलीस स्टेशन देवलापार येथे कलम १२ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

## अवैध दारू निर्मिती, विक्री आणि वाहतूक, सेवन करणाऱ्यांवर २६ गुन्हे दाखल, ६७,०७०/—रूपयाचा मुद्देमाल जप्त

दिनांक २९/०९/२०२६ रोजी मा. श्री. हर्ष पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा व श्री. अनिल मस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली अवैध दारूची निर्मिती, विक्री, साठवणूक, वाहतूक तसेच दारूचे सेवन करणाऱ्या व्यक्तींविरुद्ध प्रभावी कारवाई करून दारूबंदी कायद्यान्वये एकूण २६ गुन्हे दाखल केले.

**पोलीस स्टेशन जलालखेडा** येथे ०३ गुन्हे नोंद. **पोलीस स्टेशन कोंढाळी** येथे ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन सावनेर** येथे ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन केळवद** येथे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन मोहपा** येथे ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन खापा** येथे ११ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन वेलतूर** येथे ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन उमरेड** येथे ०६ गुन्हे नोंद.

नमुद कारवाईत एकुण ४५९० मिली देशी दारू, १२९६० मिली विदेशी दारू, ०३ लिटर मोहाफुल दारू, ०१ मोसा असा एकुण ६७,०७०/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.

जनसंपर्क अधिकारी
नागपूर जिल्हा (ग्रामीण),